
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक ४था, मुंबई । जून २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 4, Mumbai I June 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50






देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५८वे, अंक ४था,
जून २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




सामूदाईक व्रतबंध सोहळा, मुलुंड



सामुदायिक व्रतबंध सोहळा, बेळगांव

# अभिनंदन!!!

## माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि पदवी परीक्षेत (२०२५) यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींचे अभिनंदन आणि विशेष कौतुक



क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

# कर्तृत्ववान व्यक्तीमत्व - सौ. रोहिणीताई तडवळकर



आपल्या अखिल अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यवाह सौ. रोहिणी तडवळकर यांची सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे, त्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम अभिनंदन आणि भविष्यकालीन कार्यास हार्दिक शुभेच्छा सौ. रोहिणीताई या प्रथमपासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित कार्यात सहभागी आहेत. प्रथम राष्ट्र सेविका समिती आणि विद्यार्थी दशेत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कामात त्या सहभागी होत्या. १९८० साधी सोलापुरात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रांत अधिवेशन होते त्या वेळेपासून माझा आणि सौ. रोहिणीताई यांच्याशी संपर्क झाला. अधिवेशन काळात त्या मला सीनियर होत्या. त्यावेळी मी नुकताच अभाविपच्या कार्यात सहभागी झालो होतो. सौ. रोहिणीताई या विद्यार्थी परिषदेच्या मुशीतून ताऊन सुलाखून निघालेल्या आहेत. त्यांच्या कामाची आणि विचारांची बैठक पक्की आहे. आक्रमक, सडेतोड आणि अभ्यासू वृत्ती आणि आपल्या विचारावर ठाम राहणे ही त्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत. या गुणवैशिष्ट्यावरच समाजातील सर्व घटकांची आणि सर्व राजकीय पक्षातील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी नाते, स्नेह आणि मैत्री आहे. सौ. रोहिणीताई यांचा परिचय - सौ. रोहिणीताई यांचे शिक्षण बी.कॉम., डी.बी.एम., एम.एस.डब्ल्यू. असे झाले आहे. सोलापूर मधील रोटरीच्या मूकबधिर विद्यालयाच्या प्राचार्या म्हणून त्या निवृत्त झाल्या आहेत. राजकीय कारकीर्द - एकीकडे सौ. रोहिणीताई शाळेत शिक्षिका म्हणून असतानाही त्यांचे राजकीय आणि सामाजिक कार्य सुरूच होता. १९९२ साली त्या सोलापूर महानगरपालिकेत शहरातील शुक्रवार पेठ या परिसरातून नगरसेविका म्हणून प्रथम निवडून आल्या. त्याच काळात त्यांनी महापालिकेच्या परिवहन समितीच्या सदस्या म्हणून कामकाज पाहिले. त्यानंतर २००२ ते २००७ या कालावधीत शहरातील बाळीवेस परिसरातून महापालिकेवर निवडून आल्या. त्यानंतर २०१२ ते २०१७ या कालावधीत त्यांना नागरिकांनी पुन्हा नगरसेविका म्हणून महापालिकेवर निवडून दिले. याच काळात भारतीय जनता पार्टीने त्यांच्यावर महापालिकेतील विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी दिली. ही जबाबदारी ही त्यांनी अतिशय निष्ठेने आणि जबाबदारीने पार पाडून सत्ताधारी पक्षाला शहरातील विविध विकास कामे उत्तम रीतीने करण्यास भाग पाडले आपल्या कामाचा ठसा उमटविला. तसेच यापूर्वी त्यांनी सोलापूर शहर महिला आघाडी प्रमुख म्हणूनही भारतीय जनता पक्षाचे काम केले आहे. सामाजिक काम - सौ. रोहिणीताई यांनी केवळ राजकीय क्षेत्रात कामकाज केले असे नाही तर सामाजिक क्षेत्रातही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. शुक्रवार पेठ परिसरात राणी लक्ष्मीबाई नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी आपले काम चालू ठेवले आहे. याबरोबरच अपंग विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एक अपंग प्रशिक्षण संस्था स्थापन करून अपंगांना न्याय देण्यासाठी काम सुरू केलेले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेटवरही त्यांची राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नेमणूक झालेली आहे. या सामाजिक कार्याबरोबरच सोलापुरात ब्राह्मण समाज सेवा संघ, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, यासह विविध संघटनावरही त्यांनी काम केले आहे आणि अद्यापही करत आहेत. अशा या आपल्या संस्थेच्या सचिवा आणि बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या सौ. रोहिणीताई तडवळकर यांची सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षपदी निवड झाली. विशेष म्हणजे भारतीय जनता पार्टीच्या आत्तापर्यंतच्या सोलापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेची शहराच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही आपणा सगळ्यांना गौरवास्पद घटना आहे. त्यांच्या पुढील कारकीर्दीस अनेक शुभेच्छा!

# सामुहिक आरोग्यविमा योजना ही काळाची निकड आणि सभासदासाठी पर्वणी

बंधू/भगिनीनो,

२०२०-२१ च्या महामारीमध्ये आपल्यापैकी अनेकांनी त्यांचे नातेवाईक, मित्र कोविड या महामारीमध्ये गमाविली आहेत. याला काही अंशीाकरण म्हणजे त्यांना योग्य ती वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही किंवा योग्य ती वैद्यकीय सेवा त्यांच्या आर्थिक दुर्बेलतेमुळे त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. कोरोनाचा राक्षस पुन्हा येऊ पाहत आहे. शासनाने त्यादृष्टीने योग्य ती पाऊले उचलेली आहे. जेणेकरून त्याला वेळीच काढून टाकण्यात यावे त्यादृष्टीने सर्व राज्यसरकारांनी त्यांच्या आरोग्यसेवा अद्यावत केल्या आहेत आणि नागरिकांना योग्य ती मदत व सल्ला शासकीय आणि खाजगी हॉस्पिटलमधून पुरविण्यात येत आहेत त्याबद्दल भारत सरकार व सर्व राज्य सरकार यांचे आभार व अभिनंदन.

श्रीराम चरणी प्रार्थना की कोविड सारखी महामारी पुन्हा येऊ नये व सर्व नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहो.

आपल्याला सांगण्यास अभिमान वाटतो की कोविड महामारीच्या काळात अनेक संस्थांनी उदा. छ. संभाजीनगर, नाशिक, डोंबिवली, कल्याण व इतर तसेच श्री. मिलिंद सरदेशमुख आणि श्री. विकास माने यांनी वैयक्तिकरित्या आरोग्य साधने व वैद्यकीय उपकरणे तसेच महिन्याचा शिधा गरीब ब्राह्मण कुटुंबाना देऊन समाजातील कोरोना पिडीतांना योग्य ते साहाय्य केले आहे. याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. पुन:श यासर्व संस्थाना आणि सभासदांना त्रीवार सलाम आणि मानाचा मुजरा.

मंडळी, या महामारीनंतर आम्हाला असे आढळून आले आहे की, केवळ पैसे अभावी काही व्यक्तींना आरोग्य सेवा प्राप्त झालेली नसल्याने त्यांनी प्राण गमावले यांचे कारण आपल्या देशात अजूनही माफक दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध नाहीत आणि त्यादृष्टीने शासनाचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. या सर्वावर विचार करून भारत सरकारने अनेक परदेशी आरोग्यविमा कंपन्याना भारतात येण्यासाठी निर्बंध शितील केले आहेत. यामुळे जगातील अनेक आरोग्यविमा कंपन्या भारतात त्यांच्या आकर्षक योजना घेऊन शिरकाव करत आहेत. सध्यास्थिती पाहता जे सभासद व त्यांचे कुटुंब सरकारी/बँक विशिष्ट आस्थापनेच्या सेवेत आहेत त्यांना त्यांच्या मालकातर्फे सवलतीच्या दरात सामूहिक आरोग्य विमाचे सभासदत्व घेता येते परंतु जे सभासद निवृत्त झाले आहेत. आतापर्यंत केवळ अपुऱ्या ज्ञानामुळे सामूहिक आरोग्यविमा योजनेमध्ये भाग घेतलेला नाही अशासाठी एक प्रागतिक संस्था म्हणून आपले उत्तर दायत्वि आहे, अशी जाणीव आम्हाला सगळयांना झाली आहे.

गेली ३-४ वर्षापूर्वी आमच्या कार्यकारी मंडळाने आणि सर्वसाधारण सभेने आपल्या सर्व सभासदांसाठी सामूहिक आरोग्यविमा ऐच्छिकरीत्या राबवावी असे ठरविले होते. परंतु या प्रस्तावाची अंमलबजावणी आम्ही करू शकलो नाही याचे कारण सभासद पटलावर असलेल्या ८ हजारच्यावर असलेल्या सभासदांची पूर्ण माहिति म्हणजेच जन्मतारीख, सध्याचा पत्ता, व्यवसाय त्याची माहिति त्याच्याकडून देण्यात आलेली नाही. आपली ही संस्था सगळयांना माहिति आहे की, ८४ वर्षापूर्वीची आहे सगळ्यांना माहिति आहे की ८० टक्केच्यावर सभासदांनी साठीशी गाठली असून साधारण ६०-७० या वयातले असावे या सर्व ज्येष्ठ सभासदांना संस्थेचे उत्तर दायित्व म्हणून सवलती दरात सामूहिक आरोग्यविमा योजना प्राप्त व्हावी म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. याच्यामागचा अजून एक उद्देश हा, की अशी एक अभिनव योजना सभासदाच्या दृष्टीने राबवली तर सभासदांची वृद्धी होईल. नविन तरूण युवक सभासद आपल्यामध्ये सामिल होतील.

आपल्या सर्वांना माहित आहे की, आरोग्यविमा योजना कंपन्या त्यांचे प्रिमियम ठरविण्यासाठी दोन गोष्टी कटाकक्षाने लक्षात घेतात. १) भाग घेण्याऱ्या सभासदांचे वय २) एकूण सभासद संख्या ढोबळ मानाने जर वय जास्त तर त्यांचे प्रिमियम जास्त परंतु एकूण सभासद संख्या जास्त तर त्यामानाने प्रिमियममध्येही सवलत. आपल्यातील अनेक सभासद प्रथित यश विमा कंपन्यामध्ये काम करतात किंवा त्या कंपन्याचे एजेंट आहेत.

ऐच्छिक सामूहिक विमा राबविण्यासाठी प्रथमत्त: आम्ही सध्या पटलावर असलेल्या सभासदांची माहिति संकलन करत आहोत व त्या दृष्टीने साधारणत: ५ हजार सभासदांची माहिति देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याणचे श्री. जयंत देशमुख आणि श्री. रमेश पालकर यांच्या मार्गदर्शनाने संकलित केली आहे. परंतु त्यामध्ये खालील त्रुटी आढळून आली आहे. १) जन्मातारीख २) सध्याचा पत्ता ३) ईमेल ४) मोबाईल नंबर.

आमच्या उपक्रमास सर्वांची साथ मिळेल या अपक्षेने सर्व सभासद बंधू भगिनीना आव्हान की त्यांनी खालील माहिति ईमेलव्दारे कार्यालयास कळवावी (ईमेल : aadrbm@gmail.com). १) संपूर्ण नाव २) जन्मतारीख ३) संपूर्ण पता पिनकोड सहीत ४) मोबाईल नंबर ५) ईमेल

वरील माहिती सभासदांनी त्यांच्या संलग्न संस्था कार्यालयास दिल्यास सर्व संलग्न संस्थेने ही माहिति घेऊन मध्यवर्ती कार्यालयास १५ जुलै पर्यंत कळवावी. पुन:श आम्ही नमूद करतो की प्रस्तावित आरोग्य विमा योजना जरी ऐच्छिक असली तरी एकंदरीत सभासदाच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या हिताची त्यांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने याला योग्य तो प्रतिसाद मिळेल.

**प्रभाकर कुलकर्णी**
(कार्याध्यक्ष)

## विद्यार्थ्यांना आवाहन

गेल्या अनेक वर्षापासून मध्यवर्ती मंडळ गरजू व हुषार विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी यशैक्षणिक सहाय्यल देत आहे. य शैक्षणिक मदतल, यकर्जाऊ शिष्यवृत्तील व यपरदेशी कर्जाऊ शिष्यवृत्तील अशा तीन योजनांमधून हे सहाय्य दिले जाते. यापैकी शैक्षणिक मदतीची रक्कम ही विद्यार्थ्यांना परत करावयाची नसते. मात्र अन्य दोन योजनांमधून दिली जाणारी रक्कम ही विद्यार्थ्याने शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मध्यवर्ती मंडळास हफ्त्या हफ्त्याने परत करावयाची असते. दिवसेंदिवस उच्च मध्यमिक व पदवी परिक्षेचे शिक्षण हे अधिकाधिक महाग होत आहे. त्यामानाने मंडळाकडून मदत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे फार अल्प आहे याची आम्हाला जाणीव आहे. या मदतीमध्ये वाढ करावी असा विचार चालू आहे. शैक्षणिक मदतीच्या निमित्ताने अनेक विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा मध्यवर्ती मंडळाशी संपर्क येतो. खरं म्हणजे ही परस्पर संबंधाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी आपला शिक्षणक्रम पूर्ण करून नोकरी वा व्यवसाय सुरु केल्यानंतर मध्यवर्ती मंडळाचे आजीव सभासदत्व अवश्य घ्यावे आणि नंतर आपल्या सवडीनुसार यथाशक्ती मंडळाच्या कामात मदत करावी. असे निर्दशनास आले आहे की, विद्यार्थ्यांना दिली जाणारी मदत ही बँकेत खाते नसल्याने मंडळाकडे परत येते. अशावेळी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी स्वतःचे बँक खाते उघडून मगच मंडळाकडे मदतीसाठी अर्ज करावा. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ राहील. ज्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेच्या कार्यक्षेत्रात विद्यार्थ्याचे वास्तव्य आहे त्या संस्थेचे शिफारस पत्र जोडावे. शैक्षणिक सहाय्याच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक व मध्यवर्ती मंडळ यांचे परस्पर संबंधाचे नाते निर्माण होते, ते पुढील काळातही अधिक दृढ व्हावे अशी मनापासून इच्छा आहे. अर्जाचा नमूना मासिक पत्रिकेत दिला आहे.

# दैनंदिन जीवनात दासबोध समर्थांनी अभिप्रेत भक्तीयोग

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

भक्तीयोग म्हणजे ईश्वराशी प्रेमपूर्ण संबंध निर्माण करणे, मन, वाणी आणि कृतीतून त्याची सतत उपासना व त्याचे स्मरण करणे. योग म्हणजे संयोग– जीवाचे परमात्म्याशी मिलन. भक्तीयोग हा त्या योगाचा एक मार्ग आहे, जो भावपूर्ण, निस्वार्थ, समर्पणात्मक भक्तीवर आधारित आहे. भक्ती म्हणजे भगवंतावर निस्सीम प्रेम ठेवून त्याच्यात पूर्णपणे विलीन होणे. भक्त या शब्दाचा मूळ संस्कृत अर्थ आहे –भज् या धातूपासून निर्माण झालेला, ज्याचा अर्थ आहे सेवा करणे, स्मरण करणे, पूजन करणे. भक्त या शब्दाचा दुसरा एक अर्थ असा कि जो भगवंताहून विभक्त नाही असा तो भक्त. भगवंताशी एकरुप असणारा भक्त. भक्त म्हणजे जो सतत भगवंताच्या आठवणींमध्ये राहतो, जो अहंकाररहित, नम्र आणि प्रेमभावनेने ओतप्रोत असतो, जो स्वतःच्या लाभापेक्षा भगवंताच्या इच्छेला प्रधान मानतो.

समर्थ म्हणतात: भक्त म्हणिजे तोच खरा जो भगवंताच्या इच्छेप्रमाणे चालतो, आणि संकटातही हार जाणत नाही.

समर्थ रामदास स्वामी यांनी 'दासबोध' ग्रंथात भक्तीयोगाचा सखोल विचार मांडला आहे. नवविधा भक्ती (श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन) यांचा महिमा दासबोधात वर्णिला आहे. दासबोधात भक्ती ही व्यवहारात राहून ईश्वराच्या सान्निध्यात पोहोचण्याची वाट म्हणून स्पष्ट केली आहे. दासबोधातील भक्तीयोगाचे मुख्य मुद्दे: ज्ञान, ध्यान, भक्ती हे सर्व मार्ग समर्थ मान्य करतात, पण भक्ती

**JV MARKETING & INVESTMENTS**
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*
*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

ही सर्वसामान्यांसाठी सोपी आणि प्रभावी वाट आहे. गुरुभक्ती ही खरी ईश्वरभक्ती मानली आहे. भक्तीमध्ये कर्तव्य, संयम, नम्रता, आणि सात्त्विकता आवश्यक आहे. उदाहरण: अंतःकरण भक्तियुक्त, करावे सतत ईश्वरस्मरण, प्रपंचातही तोच धर्म, हाच खरा साधनमार्ग. – दासबोध. भगवद्गीता ही भक्तीयोगाचे गूढ उलगडणारी अत्यंत महत्त्वाची ग्रंथ आहे. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तीयोग यांचे सखोल विवेचन देतात. गीतेतील भक्तीयोगाचे ठळक मुद्दे (अध्याय १२ – भक्तियोग):

✻ भक्तीच्या मार्गाने मी सहज प्राप्त होतो. (गीता १२.६–७) ✻ जो सर्व प्राणिमात्रांमध्ये समता बाळगतो, द्वेषहीन आहे, नम्र आहे, क्षमाशील आहे, असा भक्त मला प्रिय आहे. ✻ ईश्वरावर पूर्ण श्रद्धा, समर्पण आणि निःस्वार्थ प्रेम हे भक्तीयोगाचे मूळ तत्त्व.

गीता म्हणते:

✻ मन्मना भव मद्भक्तो, मद्याजी मां नमस्कुरु म्हणजे – माझ्यावर मन लाव, माझा भक्त हो, माझी पूजा कर, मला नमस्कार कर.

समर्थ रामदासस्वामी यांचा भक्तीयोग म्हणजे – ✻ रामभक्ती म्हणजे कर्तव्यपूर्ती होय. ✻ भक्ती आणि सेवा एकत्र नांदते. ✻ प्रपंचामध्ये राहूनही भगवंताच्या स्मरणात असणे. ✻ गुरुसेवा आणि राष्ट्रसेवा हीच खरी भक्ती.

हिंदू धर्मामध्ये भक्ती योगाचे अनुसरन करणाऱ्या भक्तांचे चार प्रकार पडतात. काहीजण भक्ती मार्ग अनुसरतात कारण, ते चिंता किंवा त्यांच्या जीवनातील परिस्थितीमुळे खूपच तणावाखाली असतात आणि त्यामुळे ते भक्ती योगाकडे एक दिलासा देणारा मार्ग म्हणून बघतात. दुसऱ्या प्रकारातील भक्त देवाला जाणून घेण्याच्या कुतूहलापोटी आणि त्यांची बौद्धिक जिज्ञासा असल्याने भक्ती मार्गाचे अनुसरण करतात. तिसऱ्या प्रकारचे भक्त या किंवा पुढच्या जीवनात चांगली फळे मिळावीत म्हणून भक्ती मार्गाचे अनुसरण करतात. चौथ्या प्रकारचे भक्त देवावर केवळ शुद्ध प्रेमभावनेने प्रेम करतात. त्या दिव्या प्रेमाच्या अनुभवापलीकडे त्यांना त्यातून काहीही जाणून घ्यायचे किंवा मिळवायचे नसते. शेवटच्या प्रकारचा भक्त जो शुद्ध अंतःकरणाने देवावर प्रेम करतो त्याला भगवंतही आपले म्हणतात. भक्ती ही आत्मा व परमात्म्याची एक भेट आहे. ती भक्ताला मानसिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि भावनिक पातळीवर उन्नत करते.

............

**डॉ. नीरज रायते (मो. ९९२२४२७०६७)**

डॉक्टरकडे जाताना आपल्याला होत असलेल्या आजाराचे योग्य ‘निदान’ होणे हे उपचाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असते यात शंकाच नाही. त्यामुळे या प्रक्रियेत रुग्णाचा शंभर टक्के सहभाग असणे आवश्यक असते. रुग्णाने स्वत:हून डॉक्टरकडे जाणे, ते पण विनाविलंब जाणे खूपच महत्त्वाचे असते फोन करुन, रिपोर्टस् पाठवून, हस्ते – परहस्ते आपल्या आजाराविषयी चौकशी करणारे अनेक रुग्ण असतात. याशिवाय ‘सहज भेटलो’ म्हणून सल्ला विचारणारे अनेक महाभाग असतात. अशा वेळी अपुऱ्या माहितीवर चुकीचे सल्ले दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मी स्वतः अश्या चर्चा शक्यतो टाळतो आणि विनम्रपणे शांतपणे भेटण्याविषयी सुचवतो .विविध ठिकाणी आयोजित केलेल्या रोगनिदान किंवा आरोग्य शिबिरात मोफत तपासणी करुन विनाकारण चिंता करणारे चिंतातुर रुग्ण अलीकडे वाढले आहेत. हे पूर्णपणे चुकीचे आहे. एखादे ‘अबनॉर्मल’ फाईडिंग म्हणजे विलक्षण गंभीर परिस्थिती आहे असे मानणे चुकीचे असते. तसेच एखादे लक्षण

म्हणजे मोठ्ठा रोग असे समजून धावाधाव करणे निश्चितच वेडेपणाचे! खोकला हा सर्दी पडशाने होतो, तसाच टी. बी.च्या आजारात असतो किंवा फुफ्फुसाच्या कॅन्सरमध्येही असतो. संडासवाटे होणारा रक्तस्राव हा फिशर अर्थात भगंदर मुळे असू शकतो तसाच तो मोठ्या आतड्याच्या कॅन्सरमुळे ही असू शकतो त्यासाठी डॉक्टरांचा प्रत्यक्ष भेटून सल्ला घेणे, तपासणी करणे आणि रोगनिदान निश्चित होणे आवश्यक असते. 'कावीळ' लिव्हरच्या आजारात असते. तशी रक्तपेशीच्या विकृतीमुळे किंवा पित्ताशय, पित्तखडे यामुळे होते. या सगळ्याच आजारांचे उपचार वेगवेगळे असतात. म्हणून आरोग्य तपासणी करणे हेच योग्य असते. तसे न करता गंडेदोरे, काढे, झाडपाला असे अशास्त्रीय अघोरी उपचार करणे रुग्णाच्या हिताचे नसते हे लक्षात घ्यायला हवे. आजाराचे निश्चित निदान, स्वरुप, गांभीर्य समजून घेण्यासाठी डॉक्टरांची भेट घेणे, त्यांना सर्व माहिति देणे, शारीरिक तपासणी करणे, आवश्यक त्या प्रयोगशालेय चाचण्या करणे आपल्याच हिताचे असते. डॉक्टरांचे असे मार्गदर्शन नेहमीच मोलाचे असते!मित्रांनो, आपण हे पण लक्षात घ्यायला हवे की, काही आजार गनिमी कावा करणाऱ्या शत्रूंसारखे असतात. ते अचानक घाला घालतात. अशा आजारांची पूर्वसूचना बऱ्याच वेळा नित्यनैमित्तिक शारीरिक तपासणीत मिळते. रुग्णाला कुठलाही त्रास नसताना, कुठलेही लक्षण किंवा चिन्ह नसताना, मधुमेह, अतिरक्तदाब, जन्मजात हृदयविकार असे आजार अनेक दिवस छुपे राहतात. कोव्हिडनंतर समाजाचा आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे ही चांगली बाब आहे. ४० शी नंतर वाढदिवसाच्या दुसऱ्या दिवशी वर्षातून एकदा आरोग्य तपासणी मला महत्त्वाची वाटते ह्या तपासणीमुळे अनेक छूप्या आजारांचे लवकर निदान झाल्याने आपले आयुष्मान नक्कीच वाढू शकते. पुरुषांमध्ये करायच्या तपासण्या वेगवेगळ्या असतात. हृदयाच्या व आरोग्याच्या सर्व तपासण्यामध्ये पुरुषामधे प्रोस्टेटची तपासणी तर स्त्रियांमध्ये pap smear ही गर्भपीशवीच्या तोंडाची तपासणी तसेच स्तनांची mammography महत्त्वाची आहे.अशा नियमित दरवर्षी केलेल्या तपासण्या तुलनात्मक अभ्यासासाठी बऱ्या पडतात. त्यामुळे लवकर झालेले निदान पुढील अडचणी टाळू शकते .गर्भारपणीच्या नेहमीच्या तपासणीत अशा छुप्या जन्मजात विकृती सोनोग्राफीमध्ये लक्षात येऊ शकतात. सुलभ




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH
B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant
LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund
M. : 9930445721 / 9702837022
Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

प्रसूतीसाठी अशी तपासणी करणे आईच्या आणि बाळांच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असते. अशा तपासण्यांना 'स्क्रीनिंग टेस्ट' असे म्हणतात. व्याधीचे निदान अगदी प्राथमिक अवस्थेत होण्यासाठी त्या उपयोगी आहेत. 'हेल्थ चेक अप' ही आता दृढ झालेली संकल्पना आहे. आपला वाढदिवस साजरा करताना त्यासोबत आपल्याच स्वास्थ्यासाठी, सुरक्षित भवितव्यासाठी डॉक्टरकडे जाऊन संपूर्ण शारीरिक तपासणी आणि महत्त्वाच्या प्रयोगशालेय चाचण्या करून घेणे..., त्याची नोंद ठेवणे आपल्याच हिताचे आहे हे लक्षात घ्यायला हवे.

निरामय जीवन हेच आपले वैभव आहे. आजारी पडल्यानंतर धावाधाव करण्यापेक्षा आजारीच पडू नये यासाठी धडपडणे हे सुजाण व्यक्तीचे लक्षण आहे; असे सुजाण नागरिक समर्थ आणि संपन्न देश बनवितात. आपल्या डॉक्टरमित्रांच्या मार्गदर्शनानुसार जीवनाची निरामय वाटचाल करणे आपल्याच हाती आहे. हे लक्षात घ्यायला हवे!

## संलग्न संस्था वृत्त

**मुलुंड** : बुधवार दिनांक ७-५-२०२५ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड तर्फे सामुदायिक व्रतबंध आयोजित करण्यात आला होता.श्री.अभय कुलकर्णी यांनी व्रतबंधाचे पौरिहत्य केले. सौ व श्री.भगवानराव आडगावकर (कार्याध्यक्ष) यांनी संस्थेतर्फे पुण्याहवाचन केले. ४ बटूंचा उपनयन संस्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या कार्यकारिणी मंडळांचे सदस्य, विश्वस्त मंडळांचे पदाधिकारी, महिला शाखा अध्यक्षा उपस्थित होते. सामुदायिक व्रतबंधाचे औचित्य साधून इच्छुकांनी संस्थेला देणगी दिली.सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम अतिशय उत्तम झाला. विशेष - संस्थेच्या विश्वस्त मंडळांच्या सदस्या सौ.उज्वला जोशी यांनी आपल्या नातू चि.श्र्लोक यांचा उपनयन संस्कार या उपक्रमात केला.

**सोलापूर** : येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर यांच्यातर्फे बुधवार दि. ७ मे रोजी द्वारकाधीश मंदिरात नऊ बटूंवर सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. बाजार समितीचे नूतन संचालक मनीष देशमुख यांच्यासह ब्राह्मण समाजातील अनेक मान्यवर नागरिक यावेळी उपस्थित होते. या उपनयन सोहळ्याचे पौरोहित्य जयंत तुळजापूरकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्यवाह श्याम जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडले. द्वारकाधीश मंदिरात बरोबर सकाळी सात वाजून ३० मिनिटांनी या उपनयन सोहळ्यास सुरुवात झाली. त्यानंतर एक एक विधी होत बरोबर दहा वाजून तेरा मिनिटांनी बटूंवर अक्षदा पडल्या. या कार्यक्रमाची सुरुवात द्वारकाधीश मंदिरातील गोमातेचे पूजन करून करण्यात आली. तसेच यावेळी लक्ष्मीनारायण प्रतिमेचे, समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि कलशस्थापनाही करण्यात आली. त्यानंतर क्रमाक्रमाने धार्मिक विधी झाले. या मौजीवंधन सोहळ्यात अहिल्यानगर, पालघर येथील बटूंसह सोलापुरातील बटूही सहभागी झाले होते. हा मौजीबंधन सोहळा पूर्णपणे मोफत करण्यात आला. तसेच मुंजी साठी लागणारे सर्व साहित्य आणि सर्व धार्मिक विधी संस्थेतर्फे केले गेले. या सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेकांनी रक्तदान करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. यासाठी डॉक्टर हेडगेवार रक्त संकलन केंद्राचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी जनसंपर्क अधिकारी सुनील हरहरे, यांच्यासह त्यांच्या टीमने सहकार्य केले. या कार्यक्रमास अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबईच्या सचिवा रोहिणी तडवळकर, मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारणी सदस्य दत्ता आराध्ये, द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोतेजक संस्थेचे सोलापूरचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत येळेगावकर, कार्यवाह श्यामराव जोशी, महिला अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, विजय कुलकर्णी, शंकरराव कुलकर्णी, रंगनाथ

जोशी, ब्राह्मण सेवा संघाचे राम तडवळकर, अमृता गोसावी संपदा जोशी, निशिकांत खेडकर, नितीन कुलकर्णी, बजरंग कुलकर्णी, डी. डी. कुलकर्णी, रवींद्र नाशिककर, सीमा देशपांडे, श्रीकांत कुलकर्णी, क्षितिजा गाताडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा उपनयन संस्कार सोहळा यशस्वी होण्यासाठी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमाताई चिंचोलकर, संस्थेचे कार्यकारणी सदस्य शंकरराव कुलकर्णी यांच्यासह अनेकांनी अर्थसाह्य करून संस्थेच्या कार्यास हातभार लावला. द्वारकाधीश मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक तसेच लोभा पाटीदार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही हा उपनयन संस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी द्वारकाधीश मंदिर उपलब्ध करून दिले पद्माकर कुलकर्णी यांच्यातर्फे बटूंना उपनयन संस्काराची माहिती देणारे तर सीमा देशपांडे यांच्यातर्फे धार्मिक पुस्तक भेट देण्यात आली. रोहिणी तडवळकर यांच्यातर्फे बटूंना भेटवस्तू देण्यात आली.

**बेळगाव** : बेळगावातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाने गेल्या अनेक वर्षापासून सामुदायिक उपनयनाचा उपक्रम चालू ठेवला आहे. हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, असे विचार अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबईचे अध्यक्ष महेंद्र (भैय्या) मोहिनीराज गंधे यांनी बोलताना व्यक्त केले. सोमवारी चिदंबरनगरातील चिदंबर देवस्थानात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्यावतीने आणि समर्थ अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या सामुदायिक उपनयन समारंभास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी 'समर्थ'चे चेअरमन ॲड. अजय सुनाळकर यांनी संस्थेंच्या उपक्रमाचा आढावा घेतला आणि गेल्या २६ वर्षापासून सातत्याने आम्ही हा उपक्रम राबवीत आहोत. यंदा पाच बटूंच्या मुंजी करण्यात आल्या, अशी माहिती त्यांनी सांगितली. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी यापुढेही सहकार्य कारावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दुसरे पाहुणे अखिल जिल्हा ब्राह्मण समाज ट्रस्टचे अध्यक्ष उद्योजक राम भंडारे यांनी उद्योग व्यवसायातील ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी आपण बेळगाव जिल्हा ब्राह्मण संघाची स्थापना केली असल्याची माहिती दिली. अशा कार्यक्रमात समाजाचा सहभाग मोठया प्रमाणात व्हायला हवा, असे मत व्यक्त केले. या भागाच्या नगरसेविका आणि उपमहापौर सौ. वाणी विलास जोशी यांचेही शुभेच्छापर भाषण झाले. 'समर्थ'च्या संचालिका सुनंदा आळतेकर यांनी सूत्रसंचालन केले तर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे सचिव श्री. अरुण कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष विजेंद्र जोशी, चेअरमन विनायक जोशी, 'समर्थ'चे व्हाईस चेअरमन अभय गुडी, संचालक गणपत कुलकर्णी, प्रदीपकुमार कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी, मालतेश पाटील, छाया जोशी, अनिल भंडारी, उमेश सुनगार, परशुराम कांबळे, अस्मिता जोशी आदी उपस्थित होते.

**बेळगाव** : ता. २६ समर्थ अर्बन सोसायटीच्या मारूती गल्ली, बेळगाव येथील नूतनीकरण केलेल्या मुख्य कार्यालय आणि कॉर्पोरेट ऑफिसचे उद्घाटन बुधवारी (ता. २८) सहकारी सोसायटीचे सहनिबंधक रवींद्र पाटील यांच्या हस्ते होत आहे. संस्थेच्या चार शाखापैकी खानापूरची शाखा वगळता चन्नम्मानगर, टिळकवाडी आणि शहापूर शाखा सध्या स्वत:च्या मालकीच्या जागेत आहेत. खानापूरची शाखाही लवकरच स्वत:च्या जागेत स्थलांतरित करण्याचा संचालकांचा मानस आहे. 'समर्थ'च्या सर्व शाखा वातानुकूलित असून, ग्राहकांना चांगली सेवा देता यावी, यासाठी सातत्याने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या नव्या कार्यालयात व इतर सर्व शाखांमध्ये सुसज्ज असे लॉकर रूम असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व बाबींकडे लक्ष दिले जात आहे. ग्राहकांना उत्तमोत्तम सेवा दिली जात असल्याने सोसायटीच्या सर्व शाखा प्रगतीपर कार्य करीत आहेत. गतवर्षी सभासदांना २१ टक्के इतका लाभांश दिला असून, संस्था सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे. सध्या संस्थेकडे २४० कोटीच्या ठेवी असून, २३५ कोटींची कर्जे वितरित करण्यात आली आहेत. संस्थेच्या संचालक मंडळात ॲड. अजय सुनाळकर चेअरमन आणि अभय जोशी व्हाईस चेअरमन यांच्या नेतृत्वाखाली गणपतराव

कुलकर्णी, विनायक जोशी, प्रदीप कुमार कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी, मालतेश पाटील, सुनंदा आळतेकर, छाया जोशी, अनिल भंडारी, उमेश सुनगार, परशुराम कांबळे व अशोक पुजारी हे कार्यरत आहेत. राघवेंद्र केसनूर हे सेक्रेटरी, तर जनरल मॅनेजर म्हणून गौरी कुलकर्णी कार्य करीत आहेत. उद्‌घाटन सोहळयास सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



## श्री. यशवंत शंकर पांगारकर यांचे अभिनंदन

कल्याणमधील सहकार क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या ''दि कल्याण जनता सहकारी बँके''च्या अध्यक्षपदी श्री. यशवंत शंकर पांगारकर यांची शनिवार दि. १७ मे २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत पुढील कार्यकाळासाठी निवड झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. यशवंत पांगारकर हे मागील ४ वर्षे बँकेत संचालक आहेत. त्यांना उद्योग जगतातील आर्थिक आणि व्यवस्थापन क्षेत्रातील दीर्घ अनुभव आहे. श्री. यशवंत पांगारकर यांचे महाविद्यालयात शिक्षण 'रामनारायण रूईया' महाविद्यालयात झाले आहे. त्यांनी अभियांत्रिकी पदवी व्हि.जे.टी.आय.कॉलेजमधनू घेतली असून पदव्योत्तर शिक्षण एम.एम.एस (मार्केटींग) मुंबई विद्यापिठातून घेतले आहे. तसेच ते महिंद्र आणि महिंद्र कंपनीच्या सेल्स् विभागातून ३३ वर्षाच्या सेवेनंतर २०१८ साली निवृत्त झाले आहेत. मध्यवर्ती मंडळ तसेच कल्याणच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे सुमारे २० वर्षापासून सभासद आहेत.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे ..........................................................................................**

*** संकेत संजय वाशीकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/०४/१९८७, **जन्म वेळ :** रात्री १.००, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए आरएच (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. ए. एम. बी. ए, **नोकरी/ व्यवसाय :** Track Holidays, **वार्षिक उत्पन्न :** ८.५०लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८६९२३०७०७

*** सागर सीमा सुहास जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/०१/१९९४, **जन्म वेळ :** रात्री ११.००, **जन्म ठिकाण :** कांदिवली (मुंबई), **उंची :** ५.१०, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** अत्रि, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. ए. (मुंबई युनिव्हर्सिटी), **नोकरी/ व्यवसाय :** ओला चालवतो स्वत:ची गाडी आहे व्यसाय मुंबईत करतो, लाकडी घाना ऑईलचे ट्रेडिंग करतो, **वार्षिक उत्पन्न :** ५लाख, **अपेक्षा :** पदवीधर, नोकरी असावीच असे नाही, मुंबई व उपनगरातील असल्यास प्राधान्य, शाकाहारी असावी, वयातील अंतर ३ ते ५ वर्षे असावे, चष्मा असेल तरी चालेल, **संपर्क :** ९८६९९६१०८८०

*** अक्षय काशिनाथ कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०३/०१/१९९०, **जन्म वेळ :** दुपारी १.५७, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तर भाद्रपदा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** M.Sc., **नोकरी/ व्यवसाय :** Data Analyst at John Cockerill group, **वार्षिक उत्पन्न :** ५लाख ४०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, नोकरी करणारी, **संपर्क :** ९८१९८९७२१५

*** सुयोग रवींद्र जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/११/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी १.३०, **जन्म ठिकाण :** बोईसर, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** Higher National Diploma in Nautial Science in U.K (London), **नोकरी/ व्यवसाय :**

2nd Officer in Merchant Navy, **वार्षिक उत्पन्न :** १८लाख, **अपेक्षा :** मनमिळाऊ, समजूतदार, नोकरी करणारी किंवा नसेल तरी चालेल, **संपर्क :** ९४२२६७६८५१/९१४५३८५३१०/९४०३३२६८५१

**※ निनाद अजय संत (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०१/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ८.५५, **जन्म ठिकाण :** खामगाव (जि. बुलढाणा), **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** मुद्‌गल, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** कृत्तिका, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** B. E. in electronics, M. S. in Computer Science, **नोकरी/ व्यवसाय :** Software Engineer California (USA), **वार्षिक उत्पन्न :** १करोड, **अपेक्षा :** सुशिक्षित, अमेरिका/ कॅनडामध्ये/ऑस्ट्रेलिया काम करणारी किंवा शिकणारी, वयातील अंतर ३ ते ४ वर्ष, **संपर्क :** ९६१९८२७९०८/ ९०२२५१०३३७

**※ अमेय आनंद कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २४/०३/१९८९, **जन्म वेळ :** सकाळी ५.५, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गार्ग्य, **रास :** कर्क, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बारावी (विज्ञान शाखा), डिप्लोमा नेटवर्किंग, **नोकरी/ व्यवसाय :** पुणे, **वार्षिक उत्पन्न :** ५ ते ५.५लाख, **अपेक्षा :** मुलगी साधारण ५.० ते ५.२ असावी, मुलीचे वय १ ते ५ वर्ष कमी असावे, गोरी, शिक्षण व नोकरीची अट नाही, व्यवसायात मदत करणारी असल्यास उत्तम, समजूतदार, सांभाळून घेणारी, **संपर्क :** ७२७६२८०५९३/८२३७००१९३६

**※ स्वप्नील मकरंद महाजन (देवरूखे ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/१२/१९८९, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.५, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.३, **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मणुष्य, **शिक्षण :** बी.ए., **नोकरी/ व्यवसाय :** आर बी एल बँक (असिस्टंट मॅनेजर, एरोली), **वार्षिक उत्पन्न :** ३लाख ७०हजार, **अपेक्षा :** पदवीधर, समजूतदार, **संपर्क :** ९८२०६४०५४०/९८३३५७९७७५

**※ अमेय मोहन चितळे (चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/०८/१९९२, **जन्म वेळ :** रात्री ९.२८, **जन्म ठिकाण :** बुरहानपुर मध्य प्रदेश, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** अत्रि, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम सी ए, **नोकरी/ व्यवसाय :** एम एन सी विप्रो कंपनी हिंजेवाडी (सॉफ्टवेअर डेव्हलपर सीनियर इंजिनियर), **वार्षिक उत्पन्न :** १७लाख ५०हजार, **अपेक्षा :** मुलगी ग्रॅज्युएट/पोस्ट ग्रॅज्युएट, नोकरी करणारी किंवा नोकरी करण्याची इच्छा असणारी, कुटुंबवत्सल, पुणे मुंबई राहण्याची तयारी असावी, शाकाहारी, **संपर्क :** ९८६०९९६३६२/९८६०२९८३६७

**※ वरद मिलिंद पाठक (देशस्थ याजूर्वेदी माध्यंदिन), जन्म तारीख :** ०६/०८/१९९२, **जन्म वेळ :** पहाटे ४.२०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** तूळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** BE Electronics & Telecommunication, MTech-Software Engineering, **नोकरी/ व्यवसाय :** Manulife Life Insurance Com. Tokyo, Japan, **वार्षिक उत्पन्न :** ६७००००० Japan Yen, **अपेक्षा :** अनुरूप, ग्रॅज्युएट/पोस्ट ग्रॅज्युएट आणि काही वर्ष जपानमध्ये राहण्याची तयारी असावी, **संपर्क :** ९७६९२६५३६१

**※ भाग्येश रघुनाथ गोखले (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/०२/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ७.२९, **जन्म ठिकाण :** अकोला (महाराष्ट्र), **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** धनू, **नक्षत्र :** पूर्वाषाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.ई.(Civil), **नोकरी/ व्यवसाय :** Manager MKDM Studio PMC Pvt Ltd. Mumbai, **वार्षिक उत्पन्न :** १२लाख ५०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८३८१०१७८०५/९८२३५२०२०८

## वर पाहिजे ..........................................................................................

**※ सानिका चंद्रशेखर धोपावकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०१/१९९७, **जन्म वेळ :** रात्री ८.२०, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉम, पी जी टेक्सटाइल, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ७लाख, **अपेक्षा :**

अनुरूप, **संपर्क :** ९९२०९९९६२३/९९७५६७२५४०

*** श्वेता लक्ष्मीकांत कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १५/०२/१९८८, **जन्म वेळ :** दुपारी १.२०, **जन्म ठिकाण :** परभणी, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** धनु, **नक्षत्र :** उत्तराशाढा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. इ., एम. बी. ए., **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (बंगलोर), **वार्षिक उत्पन्न :** ४२लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९६७७११२०९

*** विदुला निशिकांत श्रोत्री (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ३०/०५/१९९६, **जन्म वेळ :** पहाटे ४.२०, **जन्म ठिकाण :** जळगाव, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (–), **गोत्र :** वत्स, **रास :** तूळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम, पी जी डी इव्हेंट मॅनेजमेंट, **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **वार्षिक उत्पन्न :** नाही, **अपेक्षा :** निर्व्यसनी, **संपर्क :** ९८५०१४८७५३/८६०५६७८८४५

*** तृप्ती जगन्नाथ रत्नाकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०६/१९९५, **जन्म वेळ :** पहाटे ३.५०, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.२, **गोत्र :** भारव्दाज, **रास :** तुला, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. ए. अपीअर्ड, **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **वार्षिक उत्पन्न :** नाही, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९२७१९९७६०९

*** दर्शना प्रसना देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/१०/१९९६, **जन्म वेळ :** रात्री ९.५३, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.४, **गोत्र :** हरितस, **रास :** धनु, **नक्षत्र :** मूळ, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. एससी., पी जी डी एम एचआर **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ५ते६लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९७६९९२५५३९

*** प्रीती रामचंद्र खरे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०५/१९८९, **जन्म वेळ :** पहाटे ५.२०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.१, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** १२वी नापास, **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **वार्षिक उत्पन्न :** नाही, **अपेक्षा :** मनमिळाऊ, समजून घेणारा, **संपर्क :** ९९६९०१८९९३

*** तनुजा पराग दातार (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/११/१९९८, **जन्म वेळ :** रात्री ८.११, **जन्म ठिकाण :** बदलापूर, **उंची :** ५, **रक्तगट :** ए (–), **गोत्र :** वशिष्ट, **रास :** तूळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी फार्मासिस्ट, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख ५०हजार, **अपेक्षा :** निर्व्यसनी, मनमिळाऊ, **संपर्क :** ७०२१६४१८७१/८२०८६०१६७१

*** अक्षता श्री सुर्डीकर (देशस्थ याजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०९/१९९५, **जन्म वेळ :** पहाटे ५.५५, **जन्म ठिकाण :** अकोला, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (–), **गोत्र :** लोहित, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम. एससी. (मॅथ्स), **नोकरी/ व्यवसाय :** बँक, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख ५६हजार, **अपेक्षा :** अनुरूप, निर्व्यसनी, **संपर्क :** ८४२४९४९९६५/८४१९९०८७८७

*** प्राजक्ता प्रमोद शेजवलकर (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** ३०/१२/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ११.१२, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५, **गोत्र :** अत्रि, **रास :** धनु, **नक्षत्र :** पुर्वाषाढा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २लाख १६हजार, **अपेक्षा :** निर्व्यसनी, शुध्द शाकाहारी, मनमिळाऊ, अध्यात्मिक, २ते३ वर्षाचे अंतर चालेल, **संपर्क :** ७०४०४१५५८८/९७१६६१३८९८७

*** मंजुषा अविनाश आमडेकर (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/०८/१९७३, **जन्म वेळ :** दुपारी २.००, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** शांडील्य, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. एस सी., **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **वार्षिक उत्पन्न :** नाही, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७७४४८२३२१२/ ९१६८४६५५६३

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ
## २०२४-२०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची यादी

| विद्यार्थी नाव | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|
| व्योम सुमित नाडगीर - (सांताक्रुज) | १०वी | ९९.०० |
| मधुरा विक्रांत उचलगांवकर | १०वी | ९८.८० |
| संजना संतोष धोंगडे - (कल्याण) | १०वी | ९७.६० |
| आदित्य दत्तात्रय गंधे - (जळगाव) | १०वी | ९६.४० |
| स्वरा अजय मोगरकर - (वडोदरा) | १०वी | ९६.२ |
| वेदिका महेश सालसिंगिकर - (नाशिक) | १०वी | ९५.६ |
| अर्पिता श्रीकांत राव - (नाशिक) | १०वी | ९१.६० |
| निरव प्रसाद रावेरकर - (डोंबिवली) | १०वी | ९०.६० |
| अव्देत श्रीकांत राव - (नाशिक) | १०वी | ७७.२० |
| तनुश्री अमित पांडे - (भाईंदर) | १२वी | ९१.६७ |
| निशांत उमेश कुलकर्णी - (नाशिक) | १२वी | ८४.३३ |
| स्वरा सौरभ मिरीकर - (पुणे) | १२वी | ८१.५० |
| वेदांगी प्रसाद रत्नपारखी - (डोंबिवली) | १२वी | ८१.५० |
| सोहम जयंत कुलकर्णी - (डोंबिवली) | बी.कॉम | ८४.०० |

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, दादर
## नवनिर्वाचित कार्यकारणी - २०२५-२०२७

**अध्यक्ष –** डॉ. अरूण भुरे **उपाध्यक्ष –** सौ. मुक्ता हुल्याळकर, सौ. वासंती काळे
**कार्याध्यक्ष –** श्री. सुधीर नाईक **उपकार्याध्यक्ष –** डॉ. यशस भुरे
**कार्यवाह –** सौ. केतकी अग्निहोत्री **सहकार्यवाह –** श्री. विवेक आफळे
**कोषाध्यक्ष –** श्री. अभिजीत देसाई

**सभासद सदस्य**

श्री. संजय दास्ताने, सौ. प्रज्ञा डोणगावकर, सौ. गौरी उचगांवकर, सौ. रोहिणी आणेकर, सौ. अर्चना दिक्षित, सौ. निता पिंगळे, श्री. प्रसाद देशपांडे

**स्वीकृत सदस्य**

श्री. नारायण जोशी, श्री. चंद्रकांत झिंजोर्डे

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ राहील.** **अर्ज मूल्य : रु. ५०/-**

पावती क्रमांक : ..................... अर्ज क्रमांक : ..................... अर्ज प्राप्त क्रमांक : .....................

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**शैक्षणिक मदतीसाठी अर्ज**

दूरध्वनी क्रमांक : ०२२–२४३० २२७३

प्रति,
मा. कार्यवाह,
अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग,
बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

महोदय,

मी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून मला मंडळाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक मदतीची आवश्यकता आहे. तरी मला नियमाप्रमाणे शैक्षणिक मदत मंजूर करावी ही नम्र विनंती. यासाठी खालील माहिती देत आहे.

१) संपूर्ण नाव : ____________________

२) पत्र व्यवहाराचा पत्ता : ____________________
मु.पो. ________ तालुका ________ जिल्हा ________ पिन कोड ________

३) ________ या शैक्षणिक वर्षात पूर्ण केलेला अभ्यासक्रम ________
मिळालेले टक्केवारी गुण (शेकडा) ________ (सोबत गुणपत्रक जोडावे)

४) ________ या शैक्षणिक वर्षात घ्यावयाचा शिक्षणक्रम

५) ज्या शिक्षण संस्थेत उपरोक्त शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे तिचे नांव पत्ता ________
________ (सोबत अधिकृत प्रवेश दाखला/बोनाफाईड सर्टिफिकेट जोडावे)

६) पालकांचे नांव व संपूर्ण पत्ता ________
________ पिन कोड ________

७) पालकाचे विद्यार्थ्याशी नाते ________

८) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ________

९) अवलंबून असलेल्या व्यक्तींची (संख्या) ________ पैकी शिक्षण घेत असलेले ________

१०) अन्य शैक्षणिक सवलत मिळते काय ________ (होय / नाही)

११) परिचित प्रतिष्ठित व्यक्तिचे नाव व पत्ता ________
________ पिन कोड ________

१२) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्याबाबतचे मान्यवर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण व्यक्तीचे अगर ज्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेच्या कार्यक्षेत्रात विद्यार्थ्याचे वास्तव्य आहे त्या संस्थेचे शिफारस पत्र जोडावे.

स्थळ : ________ अर्जदाराची सही : ________

दिनांक : ________ पालकाची सही : ________

**टीप :** १) कोणीही विद्यार्थ्यास शैक्षणिक मदत किंवा कर्जाऊ शिष्यवृत्ती यापैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल. २) गुणपत्रिका, बोनाफाईड सर्टिफिकेट व दे.ऋ.ब्रा. दाखला यासारख्या गोष्टींची पूर्तता करावी यासाठी वारंवार पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. कारण टपाल हशील बरेच वाढले आहे. ३) अर्ज मंजूरी निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. ४) या संबंधीचा निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार कार्यकारी मंडळावर राहील.

---

**कार्यालयीन टिप्पणी**

श्री./कु. ________ यांचा शैक्षणिक मदतीचा अर्ज दिनांक ________
रोजी झालेल्या शैक्षणिक मदत व कर्जाऊ शिष्यवृत्ती अर्ज छाननी समितीचे सभेत मंजूर करण्यात आला आहे.

**कार्यवाह**

# अभिप्राय

श्री. मिलिंद सरदेशमुख यांसी सप्रेम नमस्कार. एप्रिल २०२५चा अंक मिळाला. प्रथमता आपले मनापासून अभिनंदन आणि वयाने मोठा असल्यामुळे, ८६वय आहे आपल्या पाठीवर शाबासकीची थाप. खूप आनंद वाटला. समाधान झाले. मी या संस्थेचा विश्वस्त होतो आणि पुणे संस्थेचा विश्वस्त आहे. याही वयात कार्यरत आहे. रा. स्व. संघाचा पुणे शाखेचा ज्येष्ट स्वयंसेवक आहे, कार्यकर्ता आहे. माझी समाचार संबंधी सूचना होती अंक आकर्षक असावा, कव्हरपेज दोन्ही बाजू रंगीत असावे, मजकूर वाचनीय असावा, एक छोटी कथा किंव्हा उद्दबोधक गोष्ट असावी, संतांची एक दोन वचने असावीत. अंक घरी आला हातात धरला तर लगेच वाचून काढावा. या अंकात एवढा आकर्षक पणा आलेला आहे म्हणून आपले आणि आपल्या सहकार्याचे पुन्हा पुन्हा अभिनंदन आणि विशेष म्हणजे आपण डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीची माहिती सविस्तर पणे दिली आहे म्हणूनही शाबासकी. आबाजी थत्ते यांचा उल्लेख केलेला मला विशेष आवडला. कारण त्यांचा माझा ५०वर्षे परिचय होता. माझ्या विवाहास पूजनीय बाळासाहेब देवरस यांच्या बरोबर आले होते. भोजन केले शुभ आशीर्वाद दिले. यापेक्षा जीवनात आनंदाचा कोणता क्षण असू शकतो. प्रतिक्रिया म्हणून सविस्तर दिली आहे. आगे बढो. आगे बढो मिलिंदजी पुनरपी अभिनंदन.

– **बापू कुलकर्णी**, पुणे

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण 'समाचार'

आपण 'समाचार'मध्ये जाहिरात द्यावी असे आम्ही म्हणतो याला सहा कारणे आहेत - (१) 'समाचार' ही मासिक पत्रिका गेली ८८ वर्षे अव्याहतपणे दरमहा प्रसिद्ध होते आहे. (२) मंडळाचे आजीव सभासद, वार्षिक वर्गणीदार व अन्य लोकप्रिय सदरांकरिता अंक घेणारे, अशा हजारों लोकांकडे हे मासिक जाते. या संख्येमध्ये झपाटयाने वाढही होत आहे. दे. ऋ. ब्रा. समाजातील लोकांकडून, तसेच इतर समाजातील लोकांकडूनही मासिक मोठ्या आपुलकीने वाचले जाते. (३) वधू-वर स्थळांची माहिती, विविध विषयांवरील लेख, व्यक्तिपरिचय, संलग्न संस्था माहिती आदी सदरांमुळे या मासिकाने वाचकांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आहे. (४) संस्थेच्या चाळीस संलग्न संस्था आहेत. यामध्ये बेळगांव, हैदराबाद, बडोदे, इंदूर, इत्यादी महाराष्ट्राबाहेरील संलग्न संस्था आहेत तर मुंबई, दादर, विलेपार्ले, मुलुंड, ठाणे, डोंबिवली कल्याण, पुणे, नाशिक, सोलापूर, बार्शी, नागपूर, अकोला, धुळे, जळगांव, भुसावळ इत्यादी महाराष्ट्रातील संलग्न संस्थाही आहेत. या सर्व संलग्न संस्थाकडे हे मासिक जाते. अशा रितीने कित्येक गावागावातून व शहरातून हजारो वाचकांपर्यंत मासिक पोहचत आहे. (५) 'समाचार'चे जाहिरातीचे दरही इतर मासिकांच्या जाहिरात दरांच्या तुलनेत अल्प असल्याने सर्वांनाच परवडणारे असेच आहेत. (६) 'समाचार' मासिक चालवणारी संस्था, ही सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतीक व धार्मिक कार्य करणारी रजिस्टर्ड संस्था आहे. यामुळे आपली जाहिरात म्हणजे सामाजिक बांधीलकी मानून कार्य करणाऱ्या संस्थेला एका परीने देणगीच आहे.

**दे.ऋ.ब्रा. समाचारामधील जाहिरातीचे दर :**

| **तपशील** | **एका अंकाचे रुपये** | **वार्षिक रुपये** |
|---|---|---|
| (१) पृष्ठ क्र. ३.४.१७.१८.१९ (रंगीत) ७ x ९.३० | ३०००/- | २५,०००/- |
| (२) मासिकातील आतील पाने | | |
| अ) संपूर्ण पान (कृष्णधवल)७ x ९.३० | २,५००/- | २०,०००/- |
| ब) अर्धे पान (कृष्णधवल) | १०००/- | १५,०००/- |



IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum.
**Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161

**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357

**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. Ph.: 2431257

**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road. Ph.: 63630 90655

संस्थेच्या मुख्य कार्यालय
आणि कार्पोरेट ऑफिसच्या
नूतनीकरणानिमित्त
विशेष ठेव योजना

30 महिन्याच्या मुदत ठेवीवर

11%* व्याज

*अटी लागू

**ॲड. अजय ए. सुनाळकर**
चेअरमन

**अभय व्ही. जोशी**
व्हा. चेअरमन

संचालक मंडळ : गणपत ए. कुलकर्णी • विनायक जी. जोशी • प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी • मालतेश जी. पाटील • सुनंदा सी. आळतेकर • छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी • उमेश डी. सुणगार • परशुराम एम. कांबळे • अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर - सेक्रेटरी • गौरी एस. बिडी - जन. मॅनेजर

ही योजना 30 मे 2025 ते 30 जून 2025 या कालावधीसाठी

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध.**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**


Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH